# ‘प्रसिध्दी पत्रक’

## पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

गुरुवार, दि.१२/०९/२०१९

प्रेस नोट                    दिनांक :– 12/09/2019

**परंडा येथील अजिंक्य राजे पेट्रोल पंपावर दरोडा टाकणारी टोळी 24 तासात अटक.**
**परंडा पोलीसांची कार्यवाही.**

परंडा ते कुर्डुवाडी जाणारे राज्य मार्गावरील अजिंक्य राजे पेट्रोल पंपावर दिनांक 09/09/2019 रोजी पहाटे आडीच ते तीन वाजण्याचे सुमारास पंपावरील कर्मचा–यावर अज्ञात इसमांनी चार चाकी वाहनातुन येवुन पंपातील कर्मचा–यांना चाकुचा धाक दाखवुन डोळ्यात मिरची पुड टाकुन मारहाण करून जखमीकरून पेट्रलपंपातील 1,92,000 रोख रक्कम व मोबाईल असा एकुण 1,97,670 रू.चा ऐवज जबरीने चोरून घेवुन गेले होते.त्याबाबत पोलीस ठाणे परंडा येथे गु.र.नं.230/19 कलम 397 भादवी गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयात परंडा पोलीस यांनी सत्वर तपासाचे चक फिरवुन अजिक्यराजे पेट्रोल पंपावर मॅनेजर म्हणुन काम करणारे अजित हवालदार गायकवाड यांना ताब्यात घेवुन गुन्हया संदर्भाने सखोल चौकशी केली असता सदर चा गुन्हा हा 1)अजित हवालदार गायकवाड पेट्रोल पंप मॅनेजर, 2) श्रीराम महादेव खरात पेट्रोल पंप कामगार, 3) राहुल प्रभाकर दाबाडे 4) अजित भाउराव धेंडे सर्व राहणार डोंमगांव ता.परंडा व 5)अनिल देवीदास कांबळे रा.हडपसर पुणे या सर्वानी मिळुन केला असले बाबत तपासात निष्पन्न झाले. पाचही आरोपी यांना अटक करण्यात आली असुन आरोपी कडुन गुन्हयातील गेला माल रोख रक्कम 1,92,000 रुपये पैकी 92,000 हजार रुपये रोख व गुन्हयातील 3 मोबाईल किंमत 5670 रुपये, गुन्हयात वापरले वहान 1) स्वीप्ट डिझायर कार कमांक एम.एच.50–2525 किंमत 3,50,000 रुपये, 2) आल्टो मारुती कार नंबर एम.एच.12के.वाय. 6208 किंमत 1,50,000 असा एकुण 5,97,670 रुपये चा माल हस्तगत केला आहे.गुन्हयातील नमुद पाच आरोपी दि. 16/9/2019 रोजी पर्यन्त पोलीस कस्टडी रिमांड मध्ये आसुन गुन्हयाचा उर्वरित तपास चालु आहे.सदरची कार्यवाही मा.राजतिलक रोशन, पोलीस अधिक्षक उस्मानाबाद,मा.संदीप पालवे, अपर पोलीस अधिक्षक उस्मानाबाद, मा.विशाल खांबे,उप विभागीय पोलीस अधिकारी भुम यांचे मार्गदर्शना खाली पोलीस ठाणे परंडा व स्था.गु.शाखा उस्मानाबाद यांनी संयुक्तरित्या केली असुन सदरची कार्यवाही ही पोलीस अधिकारी श्री.गवळी पोलीस निरिक्षक,श्री.सय्यद पोलीस निरिक्षक निरिक्षक, श्री.राठोड सहा.पो.निरिक्षक, श्री.मोदे सहा.पोलीस निरिक्षक,श्री.बनसोडे,पोलीस उप निरिक्षक, श्री.माने पोलीस उप निरिक्षक, पो.हे.कॉ.277 माळी, पो.हे.कॉ.569 पवार, पो.ना.25 कळसाईन, पो.ना.181 काटवटे, पो.ना.1374 खुने,पो.कॉ. 5 खराट, पो.कॉ. 50 कांबळे, म.पो.ना.1090 शिकारे, म.पो.ना.1001 चव्हाण यांनी केली आहे. गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.




पोलीस निरीक्षक
पोलीस ठाणे परंडा

## "चोरीच्या मोटारसायकलसह संशयित ताब्यात, येरमाळा पोलीसांची कामगिरी."

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** दि. ११.०९.२०१९ रोजी पोलीस ठाणे, येरमाळा यांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असतांना २१.०० वा. सु. वाशी-तेरखेडा रोडवर राहुल अनिल शिंदे वय २० वर्षे रा. लक्ष्मी पारधी पिडी, तेरखेडा, हा मोटारसायकलवर संशयितरीत्या फिरत असतांना आढळला. त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याच्या ताब्यातील मोटारसायकल ही सिल्लोड जि. औरंगाबाद येथुन चोरीस गेलेली असुन त्यासंबंधी पोलीस ठाणे, सिल्लोड गु.र.नं. २६९/१८ कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे समजले.

तसेच राहुल शिंदे हा पोलीस ठाणे टेंभुर्णी, ता. भोकरदन, जि. जालना येथे गु.र.नं. १०७/१९ कलम ३०७, ३९५ प्रमाणे दाखल असलेल्या खुनाच्या प्रयत्नासहीत दरोड्याच्या गुन्हयातील पाहिजे (वॉन्टेड) आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. राहुल शिंदे यास त्याच्या ताब्यातील मोटारसायकलसह सिल्लोड पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## "जुगार अड्डयावर छापे."

**<u>पोलीस ठाणे, उमरगा:</u>** दि. ११.०९.२०१९ रोजी १५.४० वा.सु. उमरगा येथे १) महेश विठोबा जाधव २) सुभाष शरणप्पा देडे दोघे रा. उमरगा हे दोघे नरसिंह व्यंकट गिरी रा.जकेकुर, ता.उमरगा यांच्या ईशाऱ्यावरुन कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ६,६२०/-रु.च्या मालासह उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरगा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रामीण):</u>** दि. १२.०९.२०१९ रोजी ११.३० वा.सु. मौजे येडशी येथे १) महेश दिलीप हाके रा. येडशी, ता. जि. उस्मानाबाद हे कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ५५०/-रु.च्या मालासह पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रामीण) यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रामीण) येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १२.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "अवैध मद्य विक्री विरुध्द २ कारवाया"

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर):</u>** दि. ११.०९.२०१९ रोजी १३.१५ वा.सु. काशीबाई शेटीबा जाधव रा. वडार गल्ली, उस्मानाबाद ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने त्यांच्या घरासमोर २५ लिटर गावठी दारु किं.अं. १,५००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. ११.०९.२०१९ रोजी १९.४५ वा.सु. बाळु मच्छिंद्र पवार रा. कळंब हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मार्केट यार्ड, कळंब येथे १० लिटर गावठी दारु किं.अं. ५००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## “मौजे काळेगाव: किरकोळ कारणावरुन पत्नीस मारहान.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग :** अश्विनी आण्णासाहेब गडदे यांना रा. काळेगाव, ता.तुळजापूर, यांना दि. २०.०८.२०१९ रोजी ०१.०० वा.सु. मौजे काळेगाव येथे राहत्या घरी आण्णासाहेब अशोक गडदे (पती), अशोक रामचंद्र गडदे (सासरा) या दोघांनी घरातील किरकोळ कारणांवरुन शिवीगाळ करुन, लाकडी पाट्याने डोक्यात, हातावर मारहान केली तसेच त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या अश्विनी गडदे यांच्या फिर्यादीवरुन वरील दोन्ही आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

## “मौजे तेर: किरकोळ कारणावरुन जबर मारहान.”

**पोलीस ठाणे, ढोकी :** राजाभाऊ शेषेराव मदने यांना रा. तेर, ता.जि.उस्मानाबाद यांना दि. ०४.०९.२०१९ रोजी १३.०० वा.सु. मौजे तेर येथे त्यांच्याच गावातील प्रशांत आण्णा मदने, सविता आण्णा मदने या दोघांनी आपापसात संगणमत करुन “तु आम्हाला का शिव्या देतो” असे म्हणुन शिवीगाळ करुन काठीने मारहान केली यात त्यांच्या हाताचे हाड मोडले. अशा मजकुराच्या राजाभाऊ शेषेराव मदने यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द  पोलीस ठाणे, ढोकी येथे भा.दं.वि. कलम ३२६, ३२४, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मौजे जळकोट: चाकुचा धाक दाखवुन दरोडा.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग :** दि. ११.०९.२०१९ रोजी ०३.३० ते ०३.४५ वा.सु. चंद्रशेखर गोविंद गायकवाड रा. गुंजोटी, ता.उमरगा (ह.मु. जळकोट, ता.तुळजापूर) यांच्या जळकोट येथील घरात पंचवीस ते तीस वयोगटातील पाच ते सहा अनोळखी पुरुष चोरट्यांनी घसुन त्यांच्या पत्नी, आई व मुलास चाकुचा धाक दाखवुन ७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किं.अं. २,१७,०००/-रु. व रोख रक्कम ५०,०००/-रु. असा एकुण २,६७,०००/- रु. चा माल लुटून नेला आहे. अशा मजकुराच्या चंद्रशेखर गोविंद गायकवाड यांच्या फिर्यादीवरुन पाच ते सहा अज्ञात चोरटयांविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ३९५ प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मौजे शिवाजीनगर: सोन्याचे दागिने व रोख रकमेची चोरी.”

**पोलीस ठाणे, बेंबळी :** दि. १०.०९.२०१९ रोजी १०.०० ते १८.०० वा.चे दरम्यान रामेश्वर उध्दव लांडगे रा. शिवाजीनगर, ता.जि.उस्मानाबाद यांच्यासह त्यांच्याच घराजवळ राहणाऱ्या त्यांच्या भावाच्या घराचे कुलूप कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाटातील ८५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किं.अं. २,५८,८००/-रु., चांदीचे चैन जोड किं.अ. १,५००/-रु. व रोख रक्कम ८,०००/-रु. असा एकुण २,६८,३००/-रु. चा माल चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या रामेश्वर उध्दव लांडगे यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरटयाविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे भा.दं.वि. कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “उस्मानाबाद: मोटारसायकल चोरी.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) :** प्रज्योत शिवाजीराव गायकवाड रा. सांजा रोड, सरस्वती कॉलनी, उस्मानाबाद यांनी ०५.०९.२०१९ रोजी ०२.३० ते ०३.०० वा.सु. त्यांच्या घरासमोर हॅन्डल लॉक करुन

ठेवलेली हिरो होंडा एच.एफ. डिलक्स मोटारसायकल क्र. एम.एच. २५ व्ही. ९६१३ (किं.अं. २०,०००/-रु,) ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर) येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत रोडवर वाहन उभे करणाऱ्यावर कारवाई.”**

**पोलीस ठाणे, येरमाळा :** मारुती गहिनीनाथ बारकुल रा.येरमाळा, ता.कळंब यांनी दि. ११.०९.२०१९ रोजी १५.३५ वा.सु. बसस्थानक समोर, येरमाळा येथे जिप क्र. एम.एच. १३ बी.एन. ०८५३ ही रस्त्यावर वावरणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक स्थितीत उभी केलेली असतांना पोलीस ठाणे, येरमाळा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे भा.दं.वि. कलम २८३ प्रमाणे गुन्हा दि. ११.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ८६ कारवाया.”**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. ११/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ८६ कारवाया केल्या असुन त्यातुन २१,००० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

**(विनोद ज. चौधरी)**
सहा.पोलीस निरीक्षक
जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद